GRT
Golden Research Thoughts
ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय दरडोई उत्पन्नाचा अभ्यास

नानासाहेब चंद्रभान पवार
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

गोषवारा
देशाचा आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक विकास हा मानव विकासावर अवलंबून आहे. मानव संसाधनाचा विकास झाल्याशिवाय विकासाची संकल्पना पूर्ण होत नाही. प्रस्तुत अभ्यासविषय निवडीचे कारण पुढीलप्रमाणे आहे. प्रादेशिक पातळीवर जिल्हा नियोजनाचा भाग म्हणून मानव विकासाच्या संदर्भात शासन करत असलेले प्रयत्न व त्यांचा प्रभाव अभ्यासून एकंदरीत जिल्ह्यातील मानवी भांडवलाचा दर्जा सुधारून त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढवून जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नात कशी वाढ करता येईल व लोकांचे आर्थिक कल्याण तसेच राहणीमानाच्या दर्जात वाढ होण्यासाठी शासनाला धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरतील अशा महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविण्यासाठीच प्रस्तुत अभ्यासविषयाची वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून निवड करण्यात आलेली आहे.
प्रस्तुत अभ्यास विषयाचे स्वरूप हे वर्णनात्मक व व्यष्टी अध्ययनाचे असून हा अभ्यासविषय अहमदनगर जिल्ह्यापुरताच मर्यादित आहे.यासाठी दुय्यम आधारसामुग्रीचा प्रामुख्याने वापर केला आहे. प्रस्तुत अभ्यासात प्रामुख्याने दुय्यम माहिती व सांख्यिकीय आकडेवारीचा वापर केला आहे.

➢ प्रस्तावना : (Introduction)

जगातील कणत्याही देशाच्या संदर्भात मानव संसाधन विकास ही संकल्पना महत्त्वाची मानली जाते. या संकल्पनेच्या आधारेच कोणत्याही देशाला आपण विकासाच्या कोणत्या टप्प्यावर उभे आहोत आणि पुढील काळात आर्थिक विकास कसा साध्य केला पाहिजे याविषयी निर्णय घेणे सुलभ व्हावे म्हणून विविध स्तरावर मानव विकास अहवाल तयार करण्यात येत आहे. मागील दोन दशकापूर्वी देशाच्या आर्थिक विकासाचे मोजमाप दरडोई उत्पन्नाच्या साह्याने केले जात असे. ज्या देशाचे दरडोई उत्पन्न जास्त त्या देशाचा विकास जास्त याउलट ज्या देशाचे दरडोई उत्पन्न कमी त्या देशाचा विकास कमी अशी तुलना केली जात होती. अलीकडील काळात मात्र मानव संसाधन विकासाचा निर्देशांक विचारात घेऊन आर्थिक विकासाची संकल्पना बदलली आहे. त्यानुसार देशाच्या दरडोई उत्पन्नातील वाढीपेक्षा मानव विकास या घटकाला अधिक महत्त्व दिले आहे. देशाचा आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक विकास हा मानव विकासावर अवलंबून आहे. मानव संसाधनाचा विकास झाल्याशिवाय विकासाची संकल्पना पूर्ण होत नाही. आर्थिक विकासाचा दरडोई उत्पन्नातील वाढ हा निर्देशक महत्त्वाचा असला तरी तो आर्थिक विकासाचा महत्त्वाचा निर्देशक ठरू शकत नाही. कारण दरडोई उत्पन्नात वाढ होऊनही लोकांच्या राहणीमानात सुधारणा होईलच असे निश्चित सांगता येत नाही. त्यामुळे मॉरीस-डी-मॉरीस या अर्थशास्त्रज्ञाने १९७९ मध्ये सरासरी आयुर्मान, बालमृत्यूदर आणि साक्षरता हे तीन निकष विचारात घेऊन भौतिक जीवनमानाचा निर्देशांक तयार केला व यावरून लोकांचे आरोग्य, पिण्याचे पाणी, शिक्षण, सकस आहार व स्वच्छता अशा सोयी-सुविधांच्या उपलब्धतेवर मानव विकास अवलंबून असतो व त्यानुसार १९७९ मध्ये भौतिक जीवनमानाचा निर्देशांक (Physical Quality and life Index) तयार केला.[०२]

➢ अभ्यास विषयाचे महत्त्व: (Significance of the Study)

सामान्यपणे कोणत्याही देशात व प्रदेशात विकास हा उपलब्ध नैसर्गिक साधनसामग्री, वित्तीय भांडवल, मानवी भांडवल व त्याचा दर्जा आणि या संसाधनाचा कार्यक्षम वापरावर अवलंबून असतो. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत आर्थिक विचारांवर सनातनवादी विचारांचा प्रभाव असल्याने देशातील मानवी संसाधन विकासाकडे दुर्लक्ष केले व देशाच्या राष्ट्रीय उत्पन्न

वाढीला अधिक महत्त्व दिले. अशा देशातील आर्थिक विकास तुलनेने फारसा होऊ शकला नाही. तर याउलट ज्या राष्ट्रांनी देशातील मानव संसाधनाचा दर्जा विकसित करण्याला महत्त्व देऊन त्यासाठी मोठी गुंतवणूक केली त्यांना कल्याणकारी राज्याची संकल्पना प्रस्थापित करणे शक्य झाले.

अहमदनगर जिल्ह्यातील मानव संसाधन विकासाची सद्यस्थिती व त्याचे एकंदर जिल्ह्याच्या आर्थिक, सामाजिक विकासावर झालेले परिणाम अभ्यासून जिल्ह्याचा जलद व सर्वसमावेशक विकास करण्यासाठी जिल्ह्यातील संख्यात्मक मानवी भांडवलाचा गुणात्मक विकास करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. याबाबत महत्त्वपूर्ण शिफारशी करणे हे प्रस्तुत अभ्यासाचे महत्त्व आहे. प्रस्तुत अभ्यासविषय निवडीची कारण पुढीलप्रमाणे आहे. प्रादेशिक पातळीवर जिल्हा नियोजनाचा भाग म्हणून मानव विकासाच्या संदर्भात शासन करत असलेले प्रयत्न व त्यांचा प्रभाव अभ्यासून एकंदरीत जिल्ह्यातील मानवी भांडवलाचा दर्जा सुधारून त्यांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढवून जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नात कशी वाढ करता येईल व लोकांचे आर्थिक कल्याण तसेच राहणीमानाच्या दर्जात वाढ होण्यासाठी शासनाला धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उपयुक्त ठरतील अशा महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविण्यासाठीच प्रस्तुत अभ्यासविषयाची वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून निवड करण्यात आलेली आहे.

➢ अभ्यासाची उद्दिष्ट्ये :

१. अहमदनगर जिल्ह्याच दरडोई उत्पन्नाचा अभ्यास करणे.

२. अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय दरडोई उत्पन्नाचा अभ्यास करणे.

३. अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय दरडोई उत्पन्न, व जिल्हा निव्वळ उत्पन्नाशी तालुका उत्पन्नाचे प्रमाण अभ्यासणे.

➢ संशोधन पध्दती :-

संशोधनपध्दती हा प्रत्येक संशोधन कार्याचा एक अविभाज्य भाग आहे. यामुळे संशोधन विषयाची अर्थपूर्ण व पध्दतशीर मांडणी करता येते. प्रस्तुत अभ्यास विषयाचे स्वरूप हे वर्णनात्मक व व्यष्टी अध्ययनाचे असून हा अभ्यासविषय अहमदनगर जिल्ह्यापुरताच मर्यादित आहे.यासाठी दुय्यम आधारसामुग्रीचा प्रामुख्याने वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी अभ्यासाचा कालावधी सन २००४-०५ ते २०१३-१४ असा दहा वर्षाचा निश्चित केलेला आहे. प्रस्तुत अभ्यासात प्रामुख्याने दुय्यम माहिती व सांख्यिकीय आकडेवारीचा वापर केला आहे. अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, वार्षिक अहवाल याशिवाय योजना, अर्थसंवाद, EPW कुरूक्षेत्र, इतर नियतकालिके व वर्तमानपत्रे, विविध संदर्भ ग्रंथ त्याचप्रमाणे वेबसाईटवरील प्रकाशित ग्रंथ, संशोधन पेपर, निबंध, शासनाच्या विविध समित्यांचे दस्तऐवज इ. प्रकाशित व अप्रकाशित स्त्रोतांच्या माध्यमातून दुय्यम माहिती संकलित करण्यात आली आहे. अभ्यासविषयाच्या उद्दिष्टानुसार संकलित केलेल्या दुय्यम माहितीवर शास्त्रीय पध्दतीने वर्गीकरण, सारणीयन, श्रेणीयन या सांख्यिकीय प्रक्रिया केलेल्या आहेत. तथ्यांच्या विश्लेषणासाठी विविध संख्यात्मक व गणितीय साधनांचा वापर करण्यात आला आहे.

➢ अहमदनगर जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न :-

सामान्यपणे आर्थिक विकासद्वारे समाजाच्या भौतिक सुखात भर घालावी हा विकासाचा अंतिम उद्देश आहे. कोणत्याही देशामध्ये आर्थिक विकासामुळे राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होऊन वास्तव दरडोई उत्पन्न वाढून लोकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे आवश्यक आहे. याबाबतीत सर्वच अर्थशास्त्रज्ञांचे एकमत आहे. देशाच्या एकूण उत्पन्नात वाढ होणे हे विकासातील मुख्य लखण मानले जाते. वेगवेगळे देश, राज्ये अथवा प्रदेश व जिल्ह्यातील आर्थिक विकासातील तफावत ही दरडोई उत्पन्न वाढीच्या क्षमतेवरून ठरते. देशातील लोकांच्या राहणीमानात सुधारणा होण्यासाठी वस्तू व सेवांची दरडोई उपलब्धता वाढली पाहिजे म्हणून काही अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक विकास मोजण्यासाठी दरडोई उत्पन्न या निकषाचा वापर केला आहे.

मानव विकास निर्देशांकाच्या दृष्टीने दरडोई उत्पन्नाच्या आधारे निर्देशांक काढून त्या देशातील लोकांच्या भौतिक सुखात होणारी वाढ विचारात घेतली जाते. त्यामुळे शिक्षण, जन्मतः वेळचे सरासरी आर्युमान याचबरोबर दरडोई उत्पन्न हा चलघटक देखील मानव विकास निर्देशांकाच्या दृष्टीने मानला जातो. प्रत्येक राष्ट्राचा, राज्याचा तसेच जिल्ह्याचा विकास कितपत झाला आहे हे त्याच्या दरडोई उत्पन्नावरून मोजले जाते. त्यामुळे दरडोई उत्पन्न हे आर्थिक विकासाचा मापदंड म्हणून ओळखले जाते. राष्ट्रीय उत्पन्नाला देशातील एकूण लोकसंख्येने भागले असता जे सरासरी उत्पन्न मिळते त्यास दरडोई उत्पन्न असे म्हणतात.

अहमदनगर जिल्हा, महाराष्ट्र राज्यातील भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा जिल्हा आहे. व जिल्ह्याची अर्थव्यवस्था ग्रामीण कृषी प्रधान आहे. जिल्ह्याच्या उत्पन्नात प्राथमिक, उद्योग व सेवाक्षेत्राचे योगदान संदर्भिय वित्तीय वर्ष २०१२-१३ च्या चालू किंमतीनुसार अनुक्रमे १९.७९ टक्के, २२.९४ टक्के व ५७.२८ टक्के असे होते.

तक्ता क्र.१ : अहमदनगर जिल्ह्याचे चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न (सन २००४-०५ ते २०१३-१४)

वर्ष	दरडोई उत्पन्न	दरडोई उत्पन्नात झालेली वाढ	एकूण जिल्हा उत्पन्नाची राज्य उत्पन्नाशी टक्केवारी
२००४-०५	२५२१७	४००० (१८.६७ %)	२.८८
२००५-०६	२८८५०	३६३३ (१४.४१ %)	२.८२
२००६-०७	३५४५६	६६०६ (२२.९० %)	२.९१
२००७-०८	४२८१९	७३६३ (१७.२० %)	३.०२
२००८-०९	४६१५५	३३३६ (७.७९ %)	३.०१
२००९-१०	५१०६५	४९१० (१०.६४ %)	२.९६
२०१०-११	६५५०३	१४४३८ (२८.२७ %)	३.१७
२०११-१२	७१०५४	५५५१ (८.४७ %)	३.२७
२०१२-१३	७५२३३	४१७९ (५.८८ %)	३.१७
२०१३-१४	७६८७३	१३७० (१.७८ %)	२.९५
सरासरी	५१७९२.५	५५३८.६ (११.७३ %)	३.०२

टीप : कंसातील संख्या दरडोई उत्पन्नातील शेकडा वाढ दर्शवितात.संदर्भ : महाराष्ट्र शासन, अहमदनगर जिल्हा सामाजिक आणि आर्थिक समालोचन, अर्थ व सांख्यिकीय संचालनालय, मुंबई, विविध वर्षाचे वार्षिक अहवाल.

यावरून अहमदनगर जिल्ह्याच्या एकूण उत्पन्नाला जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येने भागले असता जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न मिळते. तक्ता क्र.१ मध्ये चालू किंमतीनुसार जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न, दरडोई उत्पन्नात झालेली वाढ, एकूण जिल्हा उत्पन्नाची राज्य उत्पन्नाशी टक्केवारी दर्शविलेली आहे.

वर्ष २००४-०५ मध्ये अहमदनगर जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न रुपये ९५२१७ एवढे होते. मागील वर्षाच्या तुलनेत दरडोई उत्पन्नात झालेली वाढ रुपये ४००० व दरडोई उत्पन्नाच्या वृध्दीचा दर १८.६७ टक्के राहिला. जिल्ह्याच्या उत्पन्नाचे राज्याच्या उत्पन्नाशी प्रमाण २.८८ टक्के एवढे होते. वर्ष २००५-०६ मध्ये जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न रुपये २८८५० एवढे होते. मागील वर्षाच्या तुलनेत दरडोई उत्पन्न ३६३३ रुपयांनी वाढले व त्याचा वृध्दीदर १४.४१ टक्क राहिला. एकूण जिल्हा उत्पन्नाचे राज्याच्या उत्पन्नाशी प्रमाण २.८२ टक्के एवढे होते.

वित्तीय वर्ष २००६-०७ मध्ये अहमदनगर जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न ३५४५६ रुपये एवढे होते. मागील वर्षाच्या तुलनेत ६६०६ रुपयांनी दरडोई उत्पन्नात वाढ झाली व याचा वृध्दीदर २२.९० टक्के तर जिल्ह्याच्या उत्पन्नाचे राज्याच्या उत्पन्नाशी प्रमाण २.९१ टक्के राहिले. वर्ष २००७-०८ मध्ये जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न ४२८१९ रुपये एवढे होते. ते मागील वर्षापेक्षा ७३६३ रुपयांनी वाढले. उत्पन्नात झालेली वाढ १७.२० टक्के एवढी होती. एकूण जिल्हा उत्पन्नाची राज्य उत्पन्नाशी टक्केवारी ३.०२ टक्के अशी राहिली. त्यानंतर वर्ष २००८-०९ मध्ये जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न ४६१५५ रुपये एवढे होते ते गतवर्षापेक्षा ३३३६ रुपयांनी जास्त राहिले. दरडोई उत्पन्नात झालेल्या वाढीचा दर ७.७९ टक्के व एकूण जिल्हा उत्पन्नाचे राज्याच्या उत्पन्नाशी प्रमाण ३.०१ टक्के एवढे होते. वर्ष २००९-१० मध्ये जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न ५१०२५ रुपये एवढे होते. ते मागील वर्षाच्या तुलनेत ४९१० ने वाढ झाली. वाढीचा दर १०.६४ टक्के राहिला तर एकूण जिल्हा उत्पन्नाचे राज्य उत्पन्नाशी प्रमाण २.९६ टक्के एवढे होते. २०१०-११ या वर्षात जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न रुपये ६५५०३ एवढे होते. हे गतवर्षापेक्षा १४४३८ रुपयांनी वाढले व दरडोई उत्पन्न वाढीचा वृध्दीदर २८.२७ टक्के राहिला. तर एकूण जिल्हा उत्पन्नाचे राज्य उत्पन्नाशी प्रमाण ३.१७ टक्के राहिले. वर्ष २०११-१२ मध्ये जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न रुपये ७१०५४ एवढे होते. ते मागील वर्षापेक्षा ५५५१ रुपयांनी वाढले व वाढीचा दर ८.४७ टक्के राहिला व एकूण जिल्हा उत्पन्नाचे राज्य उत्पन्नाशी प्रमाण ३.२७ टक्के राहिले. वर्ष २०१२-१३ मध्ये जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न रुपये ७५२३३ एवढे होते ते मागील वर्षाच्या तुलनेत ४१७९ रुपयांनी वाढले हा वाढीचा दर ५.८८ टक्के राहिला. या वर्षात एकूण जिल्हा उत्पन्नाचे राज्य उत्पन्नाशी प्रमाण ३.१७ टक्के एवढे होते. वर्ष २०१३-१४ मध्ये जिल्ह्याचे

दरडोई उत्पन्न रुपये ७६५७३ एवढे होते ते मागील वर्षापेक्षा १३७० रुपयांनी जास्त होते. दरडोई उत्पन्नात झालेल्या वाढीचा दर १.७८ टक्के एवढा होता व एकूण जिल्हा उत्पन्नाचे राज्य उत्पन्नाशी प्रमाण २.९५ टक्के होते.

अभ्यासकाळात अहमदनगर जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न सातत्याने कमी-अधिक प्रमाणात वाढलेले दिसून येते. अभ्यासकाळातील जिल्ह्याचे दरडोई सरासरी उत्पन्न रुपये ५१७९२.५ एवढे होते. तसेच अभ्यासकाळात अहमदनगर जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नात झालेल्या वाढीचा वृध्दीदर जास्तीत जास्त वर्ष २०१०-११ मध्ये २८.२७ टक्के व कमीत कमी वर्ष २०१३-१४ मध्ये १.७८ टक्के होता. तरीपण अभ्यासकाळात जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नात सरासरी ११.७३ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येते. राज्याच्या एकूण उत्पन्नातील जिल्ह्याच्या उत्पन्नाशी टक्केवारी विचारात घेतल्यास अभ्यासकाळात ती सरासरी ३.०२ टक्के राहिली आहे.

➢ अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय दरडोई उत्पन्न :-

अहमदनगर जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रापैकी ९३ टक्के ग्रामीण क्षेत्र व ७ टक्के नागरी क्षेत्र आहे. अलीकडील काळात ग्रामीण आणि नागरी क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधांचा विकास होत असल्याकारणाने ग्रामीण भागातील छोटे-मोठे व्यवसाय, कृषी आधारित उद्योगधंदे विकसित होत असल्याने जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात दरडोई उत्पन्न मागील तीन दशकात मोठ्या प्रमाणात वाढले आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्रात सर्वात मोठा असणारा जिल्हा म्हणून अहमदनगरची ओळख आहे. या जिल्ह्यात १४ तालुके आहेत. भौगोलिक रचनेनुसार व जमिनीच्या सुपिकतेनुसार तालुकानिहाय मोठी विषमता दिसून येते. तसेच अवर्षण प्रवण क्षेत्र म्हणून जिल्ह्याला ओळखले जाते. जिल्ह्याची संबंध अर्थव्यवस्था कृषी प्रधान आहे. मानव संसाधन विकासाच्या दृष्टीने दरडोई उत्पन्न या अभ्यासचल घटकाला विशेष महत्त्व दिले आहे.

तक्ता क्र. २: अहमदनगर जिल्ह्यातील तालुकानिहाय दरडोई उत्पन्न, व जिल्हा निव्वळ उत्पन्नाशी तालुका उत्पन्नाचे प्रमाण

तालुका	२००१		२०११		२०१४	
	तालुक्याचे दरडोई उत्पन्न	जिल्हा निव्वळ उत्पन्नाशी तालुका उत्पन्नाचे प्रमाण	तालुक्याचे दरडोई उत्पन्न	जिल्हा निव्वळ उत्पन्नाशी तालुका उत्पन्नाचे प्रमाण	तालुक्याचे दरडोई उत्पन्न	जिल्हा निव्वळ उत्पन्नाशी तालुका उत्पन्नाचे प्रमाण
अकोले	१६४५०	६.२८	६०२१०	५.६९	६९५५०	६.०२
संगमनेर	१७२२५	१०.८८	७२७२५	११.४९	७४२१०	१०.५१
कोपरगाव	१७५००	६.९८	७३०५०	७.१५	७३१००	६.५०
राहाता	१७४२५	७.१९	७३२००	१०.८३	७३२००	७.००
श्रीरामपूर	१७७७५	६.५२	७३२५०	६.८२	७६५२५	६.६०
नेवासा	१५४५५	७.२३	७१२००	८.२५	७२५१०	७.६८
शेवगाव	१५४७५	४.५१	७१२२५	५.६६	७२२१०	५.२५
पाथर्डी	१४६८०	४.५१	६०२१०	५.०३	६२२८८	५.३८
नगर	२२५२५	१९.५६	७०२२५	१५.५५	८२५५०	१७.१५
राहुरी	१८१२५	७.६५	६७४२०	७.०५	७४५००	७.१८
पारनेर	१४७७०	५.२१	६२३५०	५.५३	७०१५०	५.६९
श्रीगोंदा	१५४२५	६.१२	६४१२५	६.५६	७१२९०	६.७०
कर्जत	१५१२५	४.४५	५९५५०	४.५५	७०१२५	४.९०
जामखेड	१५३२५	२.९४	६०२२०	३.०९	७०५७५	३.३४
एकूण जिल्हा	१६९५६		६५५०३		७७५७३	

संदर्भ : अहमदनगर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, सन २००५ ते २०१४

जिल्ह्यातील तालुकानिहाय दरडोई उत्पन्नाचा वार्षिक वृध्दीदर व जिल्हा निव्वळ उत्पन्नाशी तालुका उत्पन्नाचे प्रमाण याचा तपशील तक्ता क्र. २ मध्ये दिलेला आहे. त्यानुसार सन २००१ मध्ये जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न रुपये १६९५६ होते. यापेक्षा कमी दरडोई उत्पन्न असणाऱ्या तालुक्यांत अकोले, पाथर्डी, नेवासा, शेवगाव, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत व जामखेड या आठ तालुक्यांचा यात समावेश होतो.

तर जिल्हा दरडोई उत्पन्नापेक्षा अधिक दरडोई उत्पन्न असणाऱ्या तालुक्यात संगमनेर, कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, राहुरी व नगर यांचा समावेश होतो. प्रामुख्याने ज्या तालुक्यात नागरीकरणाचे प्रमाण जास्त त्या तालुक्याचे दरडोई उत्पन्न अधिक असल्याचे स्पष्ट होते. त्यानुसार सर्वात जास्त दरडोई उत्पन्न असणारा तालुका नगर असून त्याचे दरडोई उत्पन्न २२५२५ आहे व सर्वाम कमी दरडोई उत्पन्न पाथर्डी तालुक्याचे राहिले आहे ते रुपये १४६८० एवढे होते. याच वर्षात जिल्हा निव्वळ उत्पन्नाशी तालुका उत्पन्नाचे प्रमाण विचारात घेतल्यास त्यावरून जिल्ह्याच्या उत्पन्नात व विकासात कोणत्या तालुक्याचा किती वाटा आहे हे स्पष्ट होते. नगर तालुक्याचा उत्पन्नाचे जिल्हा निव्वळ उत्पन्नाशी प्रमाण १९.५६ टक्के हे सर्वात अधिक होते. त्याखालोखाल संगमनेर तालुक्याच्या उत्पन्नाचे प्रमाण १०.८८ टक्के, राहुरी ७.६५ टक्के, नेवासा ७.२३ टक्के, राहाता ७.१९ टक्के असे होते तर जिल्हा निव्वळ उत्पन्नाशी तालुका उत्पन्नाचे सर्वात कमी प्रमाण जामखेड २.९४ टक्के एवढे होते.

२०११ या संदर्भिय वर्षानुसार जिल्ह्याचे एकूण दरडोई उत्पन्न रुपये ६५५०३ एवढे होते. यापेक्षा जास्त दरडोई उत्पन्न असणाऱ्या तालुक्याचा विचार केल्यास त्यात संगमनेर, कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, नेवासा, शेवगाव व नगर यांचा समावेश होतो. तर जिल्हा दरडोई उत्पन्नापेक्षा कमी दरडोई उत्पन्न असणाऱ्या तालुक्यांत प्रामुख्याने अकोले, पाथर्डी, राहुरी, पारनेर, श्रीगोंदा, जामखेड, कर्जत यांचा समावेश होतो. कर्जत तालुक्यातील दरडोई उत्पन्न सर्वात कमी म्हणजे रुपये ५९५५० एवढे होते. तालुकानिहाय दरडोई उत्पन्न वाढीचा वार्षिक वृध्दीदर विचारात घेतल्यास २००१ ते २०११ या १० वर्षाच्या काळात नगर जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न वाढीचा वार्षिक वृध्दीदर २९.३० टक्के राहिला. सामान्यपणे ज्या तालुक्याचा दरडोई उत्पन्न वाढीचा वार्षिक वृध्दीदर ३० टक्क्यापेक्षा अधिक आहे. त्यात नेवासा ३६.०७ टक्के, शेवगाव ३६.०३ टक्के, पारनेर ३२.२१ टक्के, पाथर्डी ३१.०१ टक्के, श्रीरामपूर ३२.२१ टक्के, संगमनेर ३२.२२ टक्के या तालुक्यांचा समावेश होतो तर ज्या तालुक्यातील दरडोई उत्पन्न वाढीचा वार्षिक वृध्दीदर ३० टक्क्यापेक्षा कमी आहे त्यात अकोले, नगर, राहूरी, कर्जत, जामखेड यांचा समावेश होतो.

संदर्भिय वर्ष २०१४ नुसार जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न रुपये ७७५७३ एवढे होते. तालुकानिहाय दरडोई उत्पन्न विचारात घेतल्यास सर्वात अधिक दरडोई उत्पन्न नगर तालुक्याचे होते. ते रुपये ८२५५५० व सर्वात कमी दरडोई उत्पन्न पाथर्डी तालुक्याचे होते ते रुपये ६२२८८ इतके होते. २०११ ते २०१४ या तीन वर्षात दरडोई उत्पन्न वाढीचा वार्षिक वृध्दीदर अहमदनगर जिल्हा ५.७३ टक्के, कर्जत ५.९२ टक्के, नगर ५.८५ टक्के, राहुरी ३.५० टक्के, पारनेर ४.१७ टक्के, अकोले ५.१७ टक्के असा होता. या काळात सर्वात कमी वार्षिक वृध्दी दराने म्हणजेच ०.०२ टक्क्याने कोपरगाव तालुक्याचे दरडोई उत्पन्न वाढले तर राहाता तालुक्याच्या दरडोई उत्पन्नात कसलीही वाढ झाली नाही. या संदर्भिय वर्षातील जिल्हा निव्वळ उत्पन्नाशी तालुका + उत्पन्नाचे प्रमाण विचारात घेतल्यास नगर तालुका १७.१५ टक्के, नेवासा ७.६८ टक्के, राहुरी ७.१८ टक्के, राहाता ७.०० टक्के, संगमनेर १०.५१ टक्के असे होते व इतर तालुक्याचे निव्वळ जिल्हा उत्पन्नाशी प्रमाण ५ ते ६ टक्क्याच्या दरम्यान असल्याचे दिसून येते. मात्र अहमदनगर जिल्ह्याच्या निव्वळ उत्पन्नाशी तालुका उत्पन्नाचे सर्वात कमी प्रमाण ३.३४ टक्के हे जामखेड तालुक्याचे होते.

यावरून दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत तालुकानिहाय तफावत आढळून येते त्याचबरोबर दरडोई उत्पन्न वाढीच्या वार्षिक वृध्दीदरात तफावत असल्याचे स्पष्ट होते. तसेच जिल्हा निव्वळ उत्पन्नाशी तालुका उत्पन्नाचे प्रमाण हे देखील कमी अधिक प्रमाणात असल्याचे स्पष्ट होते. यावरून आर्थिक विकासाच्या दृष्टीने जिल्ह्यातील तालुक्यात विषमता असल्याचे स्पष्ट होते.

- **निष्कर्ष :-**

१. देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीबरोबर वास्तव दरडोई उत्पन्न वाढवून लोकांच्या जिवनमानाचा दर्जा उंचावणे आवश्यक आहे. मानव संसाधन विकास निर्देशांकात दरडोई उत्पन्नाच्या आधारे त्या प्रदेशातील लोकांच्या भौतिक सुखात होणारी वाढ स्पष्ट होते. जिल्ह्याच्या स्थूल घरगुती उत्पन्नात सन २०१२-१३ च्या चालू किंमतीनुसार कृषी क्षेत्राचा१९.७९ टक्के, औद्योगिक क्षेत्राचा २२.९४ टक्के व सेवा क्षेत्राचा ५७.२८ टक्के वाटा राहिला आहे.

२. अहमदनगर जिल्ह्यातील चालू किंमतीनुसार वर्ष २००४-०५ चे दरडोई उत्पन्न रुपये २५२१७ एवढे होते. त्यात सातत्याने वाढीची प्रवृत्ती दिसून येते. ते वर्ष २००८-०९ मध्ये रुपये ४६१५५, वर्ष २०१०-११ मध्ये रुपये ६५५०३, वर्ष २०१३-१४ मध्ये रुपये ७६८७३ एवढे झाले. अभ्यासकाळातील जिल्ह्याचे सरासरी दरडोई उत्पन्न रुपये ५१७९२ राहिले. जिल्ह्याच्या दरडोई उत्पन्नात अभ्यासकाळात झालेल्या वाढीचा दर सर्वात अधिक वर्ष २०१०-११ मध्ये होता तो २८.२७ टक्के व सर्वात कमी दरडोई उत्पन्नातील वाढीचा दर वर्ष २०१३-१४ मध्ये राहिला तो १.७८ टक्के होता. या काळात दरडोई उत्पन्नाच्या वाढीचा सरासरी वृध्दी दर ११.७३ टक्के राहिल्याचे स्पष्ट होते.

३. राज्य उत्पन्नाशी जिल्हा उत्पन्नाची टक्केवारी सर्वात कमी वर्ष २००५-०६ मध्ये होती ती २०.८२ टक्के तर सर्वात जास्त टक्केवारी वर्ष २०११-१२ मध्ये होती ती ३.२७ होती. व अभ्यासकाळात जिल्हा उत्पन्नाचे राज्याच्या उत्पन्नाशी असणारे सरासरी प्रमाण ३.०२ टक्के राहिले असे आढळून आले.

४. जिल्ह्याच्या तालुकानिहाय अभ्यासातून वर्ष २०१३-१४ मध्ये सर्वात कमी दरडोई उत्पन्न असणारा तालुका पाथर्डी म्हणजेच रुपये ६२२८८ एवढे उत्पन्न पाथर्डी तालुक्याचे होते. तर सर्वात अधिक दरडोई उत्पन्न रुपये ८२५५० हे नगर तालुक्याचे होते. त्याखालोखाल श्रीरामपूर, राहुरी, संगमनेर, राहाता, कोपरगाव या तालुक्यांचे आहे.

५. जिल्हा उत्पन्नाशी तालुका उत्पन्नाचे प्रमाण विचाराच घेतल्यास नगर तालुक्याचे उत्पन्नाचे प्रमाण सर्वात अधिक १७.१५ टक्के होते. त्याखालोखाल संगमनेर १०.५१ टक्के, नेवासा ७.६८ टक्के, राहुरी ७.१८ टक्के, राहाता ७.०० टक्के, श्रीगोंदा ६.७० टक्के, श्रीरामपूर ६.६० टक्के, कोपरगाव ६.५० टक्के तर सर्वात कमी हे प्रमाण असलेला तालुका जामखेड ३.३४ टक्के आहे.

➢ संदर्भ :

१. Mishra – Puri, Indian Economy, Himalaya Publication House, Ed, 2002, Page 26-27.

२. Ibid (Mishra-Puri), Page 26-30.

३. Datta – Sundaram, Indian Economy (2005), S. Chand & Company Ltd. New Delhi, Page 41-42.

४. UNDP (2011), Human Development Report, Oxford University Press, New Delhi, Page 15-20.

५. Ibid, Page (15-20).

६. Govt. of India, National Human Development Report (2011), Page 20 to 30.

७. Ibid, Page 20 to 30.

८. महाराष्ट्र शासन, (२०१२-१३), जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, मुंबई, पृ. १४-१६.

९. Govt. of Maharashtra, Maharashtra Human Development Report (2012), Towards Inclusive Human Development, www.sagepublications.com, Page 138 to 142.

१०. जोत्स्ना देशपांडे, विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिकेशन, नागपूर, २०११, पृ. १७३.